# महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती

विज्ञान निर्भयता नीती

मध्यवर्ती कार्यालय : 'तारांगण', कुंदा स्मृती केंद्र, १२, युनायटेड वेस्टर्न बँक कॉलनी, शाहू नगर, गोडोली, सातारा-४१५००१.
☎: (०२१६२) २२०६५९, ■ Visit our Website : www.antisuperstition.org ■
कार्यालय : 'भास्कर' ६८, कालीकादेवी नगर, संघमा चौक, गोळीबार टेकडी रस्ता, धुळे - ४२४ ००१.
भ्रमण ध्वनी : ९४२२७९०६१०,८९७५१३०६०९ Email : avinashpatilmans@gmail.com


प्रसिध्दी करिता

## महाराष्ट्र अंनिसच्या दीड तपांच्या पाठपुराव्याचे यश, शनि शिंगणापूर व इतर देवस्थानांमध्ये महिलांना प्रवेश,

### मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाचे स्वागत |

### अंमलबजावणीची जबाबदारी सरकार व प्रशासनाची

महाराष्ट्रातील शनि शिंगणापूर, महालक्ष्मी मंदिर आणि इतर देवस्थानच्या ठिकाणी महिलांना प्रवेश देणे 1956 सालाच्या कायद्याने बंधनकारक आहे याबाबत मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे आम्ही स्वागत करीत आहोत. आता सदर निर्णयाची व कायद्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी राज्य सरकारची असून त्यामध्ये स्थानिक व जिल्हा प्रशासनाने कसोशीने कारवाई करणे आवश्यक आहे, अशी अपेक्षा महाराष्ट्र अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष भाई अविनाश पाटील यांनी पत्रकार परिषदेत प्रसिद्धी पत्रकाव्दारे जाहीर केले आहे.

शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या नेतृत्त्वात अहमदनगर जिल्ह्यातील शनि शिंगणापूर देवस्थानाबाबत केल्या जात असणाऱ्या चमत्कारांच्या दाव्याला आणि महिलांना मज्जाव करण्याच्या भूमिकेला 1998 दरम्यान आव्हान दिले गेले होते. त्यावेळी शनिच्या कोपामुळे चोरी करणाऱ्याला होत असलेल्या शिक्षेची चिकित्सा, तपासणी करू द्यावी असे आव्हान दिले. त्याबरोबरच भारतीय संविधानातील नागरिकत्वाच्या अधिकारानुसार पुरुषांबरोबर इच्छुक महिलांनादेखील शनि चौथऱ्यावरील शिळेची पूजा करण्याची संधी उपलब्ध असली पाहिजे अशी भूमिका महाराष्ट्र अंनिसतर्फे घेतली गेली होती. त्यासाठी 1998-1999 सालात पंढरपूरपासून सुरु करून राज्यभर प्रबोधन संवाद यात्रा शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या पुढाकाराने काढण्यात आली. त्यानंतर 11 जून 2000 या दिवशी अहमदनगर येथे राज्यव्यापी जेलभरो सत्याग्रहाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये सुप्रसिध्द सिने-नाट्य अभिनेते डॉ. श्रीराम लागू, डॉ. बाबा आढाव, प्रा. डॉ. एन. डी. पाटील, प्रा. डॉ. पुष्पा भावे, पन्नालाल सुराणा, व्यंकटराव रणधीर, विद्या बाळ, ॲड. निशा शिवूरकर यांच्यासह समविचारी संघटनांचे पदाधिकारी आणि महाराष्ट्र अंनिसचे राज्यभरातून आलेले 1200 कार्यकर्त्यांचा सहभाग राहिला. या सर्व आंदोलनाचे संयोजन माजी आमदार पी. बी. कडू पाटील व बाबा आरगडे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले होते.

संवेधानिक अधिकाराच्या संरक्षणाची जबाबदारी सरकारने व प्रशासनाने घेतली पाहिजे ते त्यांचे घटनादत्त कर्त्यव्य आहे. त्यासाठी त्यावेळी प्रतिसाद मिळाला नाही, राजकीय इच्छाशक्ती दाखवली गेली नाही. म्हणून महाराष्ट्र अंनिसतर्फे डिसेंबर 2000 मध्ये मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली. त्यामध्ये महाराष्ट्र शासन, धर्मादाय आयुक्त, शनि शिंगणापूर देवस्थान व महालक्ष्मी देवस्थान यांना प्रतिवादी करण्यात आले होते. न्यायालयाने त्यांचे मत मागून घेतले, परंतु नंतरच्या कालावधीत सदर याचिकेची सुनावणी होऊ शकली नाही. त्यादरम्यान याला वैचारिक विरोध आणि प्रत्यक्ष संघर्ष करण्यापैकी काही पक्ष संघटनांच्या महिला पदाधिकाऱ्यांनी कोल्हापूरच्या महालक्ष्मी

मंदिराच्या गर्भगृहात महिलांच्या गटासह प्रवेश करून आमच्या मागणीला कृतीशील पाठिंबा दर्शविला असे आम्ही मानतो. त्यानंतर मागील चार महिन्यापूर्वी शनि शिंगणापूरला शनि देवतेच्या चौथऱ्यावर एका अज्ञात युवतीने प्रवेश केला अन गजब झाला, शनिच्या शिळा प्रतिमेच्या शुध्दीकरणापासून तर त्याला जबाबदार लोकांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. त्यावर मोठ्या प्रमाणात टीका झाली. त्यानंतर भूमाता ब्रिगेडच्या वतीने शनिच्या चौथऱ्यावर प्रवेश करण्याचे प्रयत्न सुरु झाले. त्याला स्थानिकांसह देवस्थान विश्वस्थांनी विरोध केला आणि जिल्हा प्रशासनाने त्याचेच समर्थन केले. त्याविरोधात निषेद व मागण्या व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्र अंनिसने 7 डिसेंबर 2015 रोजी अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर राज्यव्यापी धरणे आंदोलन महिला सहभागाने आयोजित करण्यात आले होते. त्यांच्या मागणी निवेदनाला अहमदनगर जिल्हाधिकाऱ्यांनी काही उत्तर दिले नाहीच तर धर्मादाय आयुक्तांनी दिलेले उत्तर अत्यंत वरपांगी होते. त्याविरोधात महाराष्ट्र अंनिसने महाराष्ट्र विधीमंडळाच्या नागपूर हिवाळी अधिवेशानावेळी 15 डिसेंबर 2015 रोजी धरणे करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शिष्टमंडळासह भेट घेतली होती. तसेच सर्व आमदारांना त्यांच्या मतदारसंघात कार्यकर्त्यांनी शिष्टमंडळासह भेटून मागणी निवेदन दिले आहेत.

महाराष्ट्र अंनिसने दाखल केलेल्या जनहित याचिकेची सुनावणी सद्य परीस्थितीच्या पार्श्वभूमीवर तातडीने करावी अशी मागणी महाराष्ट्र अंनिसच्या याचिकाकर्त्यांकडून मुंबई उच्च न्यायालयाला केली गेली. त्यामुळे सुनावणीच्या दोन तारखा झाल्या. दरम्यान सदर प्रश्नाबाबत नवीन जनहित याचिका औरंगाबाद खंडपीठात दोन व मुंबई उच्च न्यायालयात एक दाखल केल्या गेल्या. त्यातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्याताई बाळ आणि ॲड. नीलिमा वर्तक यांनी दाखल केलेल्या याचिकेची पहिली सुनावणी दिनांक 30 मार्च 2016 रोजी झाली. त्यानंतर महाराष्ट्र अंनिसच्या याचिकामधील हेतू व मागणी समान असल्यामुळे न्यायालयाला दोन्ही याचिका जोडून निकाल देण्याची विनंती केली. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे आता महाराष्ट्र अंनिसची मागणी मान्य झाली आहे. गेली दीड तप म्हणजे 18 वर्षे महाराष्ट्र अंनिसतर्फे पाठपुरावा करण्यात आलेल्या शनि शिंगणापूर व तत्सम देवस्थानांमधून महिलांच्या प्रवेशाची परवानगी कायद्याने मिळणे हा महिलांच्या संवेधानिक अधिकाराचा विजय आहे. त्यामुळे यापुढे ज्या महिला पूजा - दर्शनासाठी जाऊ इच्छितात त्या भाविक महिलांनी आपल्या अधिकारांना प्रत्यक्षात येण्यासाठी पुढाकार घ्यावा आणि प्रशासनाचे त्यांच्या अंमलबजावणीसाठी अनकूल वातावरण राहील याची जबाबदारी घ्यावी असे आवाहन राज्य कार्याध्यक्ष भाई अविनाश पाटील यांनी केले आहे.